मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीरातीसाठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# 'पीएमपी'च्या ताफ्यात लवकरच येणार 400 बस

## फेब्रुवारीमध्ये होणार सेवेत दाखल : प्रवास सुरळीत होण्यास मदत होणार



**पिंपरी | प्रतिनिधी**

पुणे महानगर परिवहन महामंडळ लिमिटेड (पीएमपी) आणि केंद्रीय रस्ते वाहतूक संस्थेच्या (सीआयआरटी) अधिकाऱ्यांनी 'सीएनजी'वर धावणाऱ्या बसच्या प्रतिकृतीची (प्रोटोटाइप) पाहणी केली असून, त्याच्या उत्पादनाला मंजुरी दिली आहे. लवकरच बसच्या उत्पादनाला सुरुवात होईल.

फेब्रुवारीमध्ये ४०० नवीन सीएनजी बस 'पीएमपी'च्या ताफ्यात दाखल होतील. त्यामुळे प्रवास सुरळीत होण्यास मदत होणार आहे. यातून दररोज सुमारे तीन लाख प्रवाशांची वाहतूक होईल.

'पीएमपी'मध्ये गेल्या काही दिवसांपासून नवीन बसचा प्रश्न रेंगाळला होता. संचालक मंडळाच्या बैठकीत मान्यता मिळूनही बसखरेदीला उशीर झाला. त्यात लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांच्या आचारसंहितेचे कारण सांगण्यात आले. आता नवीन बस खरेदीला गती प्राप्त झाली आहे.

नुकतेच 'सीआयआरटी' व 'पीएमपी'च्या अधिकाऱ्यांनी एकत्रित नवीन बसच्या प्रोटोटाइपची पाहणी केली. त्याबद्दल दोन्ही संस्था सकारात्मक असून, लवकरच उत्पादनास सुरुवात होणार आहे. फेब्रुवारीमध्ये ४०० बस 'पीएमपी'च्या ताफ्यात दाखल होतील, असे नियोजन केले आहे.

पुण्यात 'बीआरटी'चे अंतर कमी होत असताना 'बीआरटी' मार्गातून धावणाऱ्या बसची संख्या वाढणार आहे. नवीन ४०० बस 'सीएनजी'वर धावतील. त्यांची रचना 'बीआरटी' थांब्यानुसार असणार आहे. या बस 'बीआरटी' व अन्य मार्गांवरही धावणार आहे. नव्या बसमुळे प्रवासी आसनावर बसून प्रवास करू शकतील.

४०० सीएनजी बस दाखल झाल्यास...

७३० - सध्या एका बसमधून सरासरी प्रवासी वाहतूक

२,९२,००० - ४०० बसमधून सरासरी प्रवासी वाहतूक

### दररोज 45 बस ब्रेकडाउन!

**» 'पीएमपी'च्या ताफ्यात दोन हजार १०० बस असल्या, तरीही प्रत्यक्षात एक हजार ६५० बस धावतात. पैकी सुमारे ४५ बस दररोज ब्रेकडाउन होतात. शिवाय आयुर्मान संपलेल्या बसची संख्याही जास्त आहे. त्यामुळे प्रवासी सेवेवर मोठा परिणाम होत आहे. यात नवीन बसची खरेदी होणे खूप आवश्यक होते. नव्या बसमुळे प्रवासी सेवा सुधारेल. सध्या बसची संख्या कमी असल्याने प्रवाशांना फटका बसत आहे.**

" पहिल्या टप्प्यात भाडेतत्त्वावरील ४०० बस दाखल होतील. दुसऱ्या टप्प्यात स्वमालकीच्या २०० बस दाखल होणार आहेत. दोन्ही बस 'सीएनजी'वर धावतील. बसची संख्या वाढल्याने पीएमपीची प्रवासी सेवा अधिक चांगली होण्यास मदत मिळेल.

- नितीन नार्वेकर, सहव्यवस्थापकीय संचालक, पीएमपी.

---

# शहरातील महायुतीच्या विजयात शंकर जगताप यांचा सिंहाचा वाटा!

## समन्वयक सदाशिव खाडे यांचे मत : विधानसभा निवडणूक निकालाच्या विश्लेषणाचा अहवाल



**पिंपरी | प्रतिनिधी**

शहरातील महायुतीचा विजय हा भाजपचे शहराध्यक्ष शंकर जगताप यांच्या कणखर व प्रेरणादायी नेतृत्वामुळे शक्य झाला. पक्षाने बूथ स्तरावर ५१ टक्के मतांचे उद्दिष्ट दिलेले असताना पक्षाच्या बूथ, मंडल व जिल्हा स्तरीय पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी शहरातील तीन विधानसभा मतदारसंघांमध्ये त्यापेक्षा कितीतरी जास्त मते मिळवत निर्विवाद विजय मिळवला व भाजपच्या वर्चस्वाची पावती दिली, असे मत पिंपरी-चिंचवड शहरातील महायुतीचे समन्वयक सदाशिव खाडे यांनी व्यक्त केले.

शहरातील निवडणूक निकालांचे विश्लेषण करणारा अहवाल खाडे यांनी नुकताच पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांना पाठविला आहे. शहराध्यक्षपदाची सूत्रे हाती घेतल्यापासून गेल्या दीड वर्षात शंकर जगताप यांच्या सूक्ष्म नियोजन, आहोरात्र मेहनत आणि कार्यकर्त्यांना दिलेल्या विश्वासामुळे महायुतीला विजय प्राप्त झाला. याच कारणामुळे त्यांचे नेतृत्व हे महत्त्वपूर्ण ठरले, ज्यामुळे पिंपरी-चिंचवड शहरात महायुतीचा विजय निर्विवाद आहे, असे खाडे यांनी अहवालात म्हटले आहे.

### भोसरी मतदारसंघातील हॅटट्रिक

भोसरी मतदारसंघात भाजपचे महेश लांडगे यांनी विजयाची हॅटट्रिक केली. २,१३,६२४ मते मिळवून त्यांनी ६३,७६५ मतांच्या फरकाने विरोधकांवर मात केली. त्यांनी मिळवलेली ५७.१% मते ही त्यांच्या लोकप्रियतेची, केलेल्या कामाची पावती म्हणावी लागेल. त्याच बरोबर शंकर जगताप यांच्या नियोजनामुळेही भोसरीत पक्षाला मोठा विजय मिळवता आला, असे खाडे यांनी अहवालात नमूद केले आहे.

### पिंपरी मतदारसंघातील भाजपचे प्रभावी काम

पिंपरी मतदारसंघात राष्ट्रवादी कॉंग्रेसचे अण्णा बनसोडे १,०९,२३९ मते मिळवून विजय मिळवला. झालेल्या मतदानापैकी सुमारे ५४ टक्के मते बनसोडे यांना मिळाली. या मतदारसंघात भाजपची ताकद मोठी असून ती बनसोडे यांच्या मागे उभी करण्यात शंकर जगताप यांची भूमिका निर्णायक ठरली, असे खाडे यांनी म्हटले आहे.

### चिंचवड मतदारसंघाचा विक्रमी विजय

**» चिंचवड मतदारसंघात भाजपचे शंकर जगताप यांनी २,३५,३२३ मते मिळवून १,०३,८६५ मतांची लक्षणीय आघाडी मिळवली. यामुळे, त्यांनी राज्यातील सर्वाधिक मते मिळवणाऱ्यांमध्ये प्रथम क्रमांक मिळवला. या मतांची टक्केवारी ६०.७३% आहे, ही शंकर जगताप यांच्या प्रभावी कार्याची आणि जनतेच्या विश्वासाची साक्ष आहे, असे खाडे यांनी म्हटले आहे.**

# मेट्रोचे 13 पिलर अन् 201 सेगमेंट कास्टिंग तयार

## राज्यात सर्वाधिक सहाव्यांदा उपमुख्यमंत्री शपथ घेतलेले पहिले नेते ठरले

**पुणे | प्रतिनिधी**

पिंपरी ते निगडी भक्ती-शक्ती चौक या विस्तारित ४.५ किमी एलिव्हेटेड मार्गिकेचे काम सुरू करण्यात आली आहे. आत्तापर्यंत १३ पिलरची उभारणी पूर्ण झाली आहे. तर, २०१ सेगमेंट कास्टिंग करण्याचे काम करण्यात येत आहे. मात्र, आठ महिन्यांत १३ पिलर उभारण्यात आले असून, अजून तब्बल १५१ पिलर उभारण्याचे काम बाकी आहे. त्यामुळे हे काम मुदतीमध्ये होणार का, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. आजमितीस केवळ १५ ते २० टक्केच काम पूर्ण झाल्याचे दिसून येत आहे.



महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन (महामेट्रो) संचालित पुणे मेट्रो प्रकल्पाच्या टप्पा-१ स्वारगेट ते पिंपरी आणि वनाज ते रामवाडीचे काम सप्टेंबर २०२४ रोजी पूर्ण होऊन टप्पा- १ वरील प्रवासी सेवेला प्रवाशांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. यानंतर स्वारगेट ते पिंपरी-चिंचवड महापालिका हा मार्ग पुढे निगडीतील भक्ती-शक्ती चौकापर्यंत वाढवण्याचा निर्णय घेण्यात आला होता. त्यानुसार मेट्रोकडून मार्ग आणि माती सर्वेक्षणचे काम पूर्ण झाले. त्यानंतर आता प्रत्यक्षामध्ये पिलर आणि पाया उभारण्याचे काम सुरू करण्यात आले आहे. या विस्तारित मार्गाला केंद्रीय गृहनिर्माण व नागरी कामकाज मंत्रालयाने २३ ऑक्टोबर २०२३ रोजी मान्यता दिली होती. ६ मार्च रोजी या विस्तारित मार्गाचे भूमिपूजन केले होते.

### तब्बल १३८ पिलरचे काम बाकी

चिंचवड, आकुर्डी, निगडी प्राधिकरण आणि भक्ती-शक्ती चौक या ठिकाणी पाया बांधण्याचे, सेगमेंट कास्टिंग आणि पिलर बांधण्याचे काम वेगाने सुरू आहे. गेल्या आठ महिन्यात १३ पिलर उभारण्यात आले असून १३८ पिलरचे काम बाकी आहे. तर, १५१ पैकी २८ पाया खोदण्यात आलेले आहे. १३३७ पैकी २०१ सेगमेंट कास्टिंग तयार झालेले आहेत. त्यातच विविध ठिकाणी वाहतुकीचा प्रश्न आणि इतर परवानगी यामुळे काम पुढे मागे होऊ शकते.

### बीआरटी मार्गाचा बळी

**» मेट्रोचे काम सुरू असल्याने सर्वाधिक मोडतोड ही बीआरटी मार्गाची होणार आहे. रस्ता, बॅरिगेट त्याचप्रमाणे दोन बस थांबा देखील संपूर्णपणे तोडण्यात येणार आहे. त्यानंतर पुन्हा त्या ठिकाणी बस थांबा उभारणे अवघड जाणार आहे. तसेच, मार्ग देखील अरुंद झाल्याने बीआरटी मार्ग पुन्हा सुरू होईल का, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.**

“ सध्या मेट्रोचे काम वेगाने सुरू आहे. त्यामुळे हे काम दिलेल्या मुदतीच्या आधी पूर्ण होण्याची शक्यता आहे. पिंपरी ते निगडी मेट्रो लवकरच मार्गावर धावेल.

**- हेमंत सोनवणे, कार्यकारी संचालक, महामेट्रो.**

---

# महापालिका निवडणुकीसाठी इच्छुक लागले कामाला!

## कोथरूड परिसरातील चित्र : महायुती आणि महाआघाडीत चुरस होण्याची शक्यता

**पुणे | प्रतिनिधी**

लोकसभा आणि विधानसभा निवडणुका पार पडल्यानंतर आता महापालिकेची निवडणूक होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्यामुळे विविध राजकीय पक्षांच्या कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. कोथरूड परिसरात काही इच्छुकांनी निवडणुकीची तयारीही सुरू केल्याचे चित्र दिसून येत आहे.

राज्यात आता नवीन सरकार स्थापन झाले असून, महापालिका निवडणुकीसाठी प्रभाग चारचा राहील की दोनचा, याकडे इच्छुकांचे लक्ष लागले आहे. आगामी निवडणूक लक्षात घेऊन कोथरूड परिसरातील विविध पक्षांच्या पदाधिकाऱ्यांनी आणि कार्यकर्त्यांनी जनसंपर्क कार्यलये सुरू केली असून, विविध सामाजिक उपक्रम राबविण्यावर भर देण्यात येत आहे.



2017 मध्ये झालेल्या महापालिका निवडणुकीत चारचा प्रभाग होता. पौड रोड परिसरातील रामबाग कॉलनी-शिवतीर्थनगर प्रभागात (क्र. 11) शिक्षकनगर, परमहंसनगर, भुसारी कॉलनी या प्रभाग 10 मधील भागांचा समावेश होता.

कोथरूड विधानसभा मतदारसंघातून लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत महायुतीला मताधिक्य मिळाले असले, तरी काही प्रभागांत महाआघाडीचा प्रभाव पाहता आगामी महापालिका निवडणुकीत चुरस निर्माण होण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. महापालिका निवडणुकीत कोणत्या पक्षाकडून कोणाला संधी मिळणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

महापालिकेच्या 2017 मधील निवडणुकीत प्रभाग क्रमांक 11 मधून राष्ट्रवादी काँग्रेस 1, भाजप 1आणि काँग्रेसचे 2 नगरसेवक निवडून आले होते. प्रभाग क्रमांक 10 मध्ये चारही नगरसेवक भाजपचे निवडून झाले होते. आगामी निवडणुकीत पक्षाकडून गेल्या टर्ममधील नगरसेवकांना पुन्हा तिकीट मिळणार का, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे. तसेच, प्रभागरचनेबाबत राजकीय वर्तुळात चर्चा सुरू आहे.

### निवडणूक लवकर होण्याची अपेक्षा

**» सामान्य नागरिक प्रत्येक वेळी प्रशासनाकडे जाऊन तक्रार दाखल करू शकत नाहीत. तसेच, प्रशासनावर देखील काही मर्यादा आहेत. त्यामुळे नागरिकांच्या तक्रारी महापालिकेत मांडण्यासाठी लोकप्रतिनिधींची उणीव सध्या जाणवत आहे. महापालिका निवडणुका लवकरात लवकर होण्याची अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे.**

### लोकप्रतिनिधींअभावी विकासाला खीळ?

- » लोकप्रतिनिधी नसल्याने प्रभागांत ठोस विकासकामांचा अभाव
- » विविध विकासकामे अर्धवट असल्याने प्रशासनावर नागरिकांची नाराजी.
- » समस्या महापालिकेत मांडण्यासाठी लोकप्रतिनिधी नसल्याने नागरिकांची गैरसोय
- » लोकप्रतिनिधी नसल्यामुळे प्रशासनावर अंकुश नसल्याचे चित्र
- » पाणीपुरवठा, रस्ते, कचरा आदी मूलभूत सुविधांअभावी नागरिक त्रस्त

# पीएमपीएमएलला मिळणार शहरात तीन जागा

## आगार, पार्किंग आणि ई-बस स्टेशन होणार, गेल्या अनेक वर्षांच्या पाठपुराव्यास अखेर यश

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहरातील वेगवेगळ्या ठिकाणी पीएमपीएमएल साठी आरक्षित जागा आहेत. गेल्या अनेक वर्षांपासून पीएमपीएमएल प्रशासनाकडून त्या जागेची मागणी होत आहे. त्यावरती निर्णय झाला नव्हता. मात्र आता त्या जागा मिळण्याचा मार्ग मोकळा झाला असून नगरविकास विभागाच्या बैठकीमध्ये याबाबत चर्चा झाली आहे. त्यामुळे लवकरच शहरातील भोसरी, रावेत, बाणेर आणि मोशी या जागा मिळू शकतील. दरम्यान, पीएमपी प्रशासनाकडून दुजोरा मिळाला आहे.



पीएमपीएलकडून पीएमआरडीएच्या हद्दीत १२२ मार्गांवर ५०३ बसमार्फत सेवा दिली जाते. पीएमपीएमएलकडून पीएमआरडीएच्या काही जागांचा पार्किंग, डेपोसाठी वापर केला जात आहे. मात्र, बदल्यात पीएमपीएमएलला लाखो रुपयांचे भाडे द्यावे लागत आहे. त्यामुळे पीएमपीएमएलने तीन ठिकाणी जागा देण्याची मागणी पीएमआरडीए प्रशासनाकडे केली आहे.

यामध्ये मोशी येथील आंतरराष्ट्रीय प्रदर्शन केंद्राजवळील जागा, भोसरी येथील मध्यवर्ती सुविधा केंद्राजवळ तसेच बाणेर येथील जागा कायमस्वरुपी देण्याची मागणी पीएमपीएमएल प्रशासनाने केली होती. पीएमपीएमएलच्या ताफ्यात नव्याने सीएनजी आणि ई-बस दाखल होणार आहेत. त्यांच्या पार्किंगसाठी जागा गरजेच्या आहेत. ई-बसच्या दृष्टीने भोसरी मध्यवर्ती सुविधा केंद्राची जागा महत्त्वाची

> बस पार्किंगसाठी आम्ही तीन ठिकाणी जागेची मागणी केली आहे. बाणेर, मोशी आणि भोसरी येथील जागेचा समावेश आहे. त्या जागा मिळाल्यास सेवा अधिक चांगल्या प्रकारे देता येतील.
>
> **- सतीश गव्हाणे, वाहतूक व्यवस्थापक, पीएमपीएमएल.**

असून त्या ठिकाणी ६० बसचा ई-डेपो केला जाणार आहे. या शेजारीच महावितरण सबस्टेशन आहे. त्यामुळे ई-बसला त्याचा फायदा होणार आहे. तसेच, मोशी येथील जागा देखील ई- बस डेपोच्या दृष्टीकोनातून महत्वाची आहे. या बरोबच बाणेर येथील जागेचाही उपयोग करता येणार आहे.

गेल्या अनेक वर्षांपासून पीएमपीएमएल प्रशासन याबाबत पाठपुरावा करत आहे. मात्र, त्यावर निर्णय झाला नव्हता. मात्र नुकताच नगरविकास विभागाच्या प्रधान सचिवांसोबत बैठकीमध्ये त्याबाबत सकारात्मक चर्चा झालेली आहे. त्यानुसार जागेचा विषय मार्गी लागणार आहे.

> संबंधित जागा या सध्या पीएमआरडीएच्या ताब्यात आहेत. त्याबाबत सातत्याने पाठपुरावा सुरू होता. नुकतीच नगरविकास विभागाने त्याबाबतची बैठक घेतली. सकारात्मक निर्णय झाला असून, आदेश प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही सुरू करण्यात येईल. त्या जागा ताब्यात आल्यानंतर निश्चितच फायदा होईल.
>
> **- डी. एम. तुळपुळे, मुख्य अभियंता, पीएमपीएमएल.**

# आळंदीतील वारसास्थळांचा अभ्यास दौरा

## महापालिका निवडणुकीत युवकांना संधी : खासदार श्रीरंग बारणे यांनी केले पक्षात स्वागत

**पिंपरी | प्रतिनिधी**

भारतातील अठरा शिवपीठांपैकी एक असलेल्या आळंदी देवाची येथील पुरातन वारसा असलेल्या तीर्थ आणि कुंडांचा अभ्यास दौरा नुकताच इंद्रायणी साहित्य परिषदेच्या पुढाकारातून पार पडला. त्यामधे साहित्य, इतिहास संशोधन क्षेत्रातील सुमारे शंभरजण सहभागी झाले होते. आळंदीतील पुरातन वारसा व त्याच्या पाऊलखुणा जतन करण्याची गरज असल्याचे मत सर्वांनी नोंदवले.



आळंदी देवाची येथील इंद्रायणी नदीकाठी असलेल्या तेरा तीर्थांची आणि पुरातन आळंदीची माहिती वारसास्थळांचे अभ्यासक ॲड. नाजिम शेख यांनी प्रत्यक्ष त्या त्या स्थळांवर जाऊन दिली. त्यांनी विविध धर्मग्रंथांच्या आधारे गेली वीस वर्षे संशोधन करून या स्थळांचा शोध घेतला. दौऱ्याची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास पुणे महापालिकेचे निवृत्त उपायुक्त ज्ञानेश्वर मोळक व नायब तहसीलदार संजय शिंदे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून करण्यात आली.

> आळंदीचे स्थळ महात्म्य पुरातन काळापासून आहे. त्याच्या पाऊलखुणा आता नष्ट झाल्या आहेत किंवा ज्या काही शिल्लक आहेत. त्या दुर्लक्षित आहेत. त्याचे संवर्धन आणि जतन करण्याची जबाबदारी प्रशासनाबरोबरच आपली सर्वांचीच आहे. त्यासाठी हा प्रयत्न आहे.
>
> **- अरुण बोऱ्हाडे, ज्येष्ठ साहित्यिक, मोशी.**

यामध्ये साहित्यिक राजेंद्र घावटे, संतोष घुले, डॉ. लता पाडेकर, डॉ. सीमा काळभोर, डॉ. पौर्णिमा कोल्हे, प्रा. शंकर जाधव, संगीता थोरात, क्रांती दिवेकर, विजय भिसे, उमेश सातकर, विजय पिरंगुटे, उत्तरेश्वर तोडकर, भालचंद्र वडके, भार्गवी लेले, विवेक नातू, सुलभा कणसे, हिरामण सस्ते, संजय जोशी, गणेश सस्ते, अमर कांदे, सुरेश आल्हाट, ज्ञानेश्वर वायकर, संतोष सस्ते, बाळासाहेब सस्ते, विठ्ठल कामठे, अलंकार हिंगे, रमेश राक्षे, गोविंद जाधव, नंदकुमार वाघमारे, शुभम गौंदर, संदीप गावडे, सुरेश लोखंडे, सुरेश डोळस, निसार महंमद सय्यद, दीपक पटेकर, अमोल पाटोळे, वासुदेव गोडे, निलेश भोसले, रविंद्र पाटील आदी सहभागी झाले होते. इंद्रायणी साहित्य परिषदेचे अध्यक्ष इतिहास अभ्यासक संदीप तापकीर, सचिव रामभाऊ सासवडे, अलंकार हिंगे, गणेश शशिकांत सस्ते, सुनील जाधव यांनी दौऱ्याचे संयोजन केले. अखेरीस श्री ज्ञानेश्वर माऊलींच्या समाधीचे दर्शन घेऊन दौऱ्याची सांगता झाली.

# अर्बन स्ट्रीटची कामे झाडांच्या मुळांवर

## मुळांजवळ टाकला जातोय बांधकामाचा राडारोडा : पदपथावरील झाडांच्या संगोपनाकडेही दुर्लक्ष

**पुणे | प्रतिनिधी**

जुन्या पुणे-मुंबई महामार्गावर दापोडी ते निगडी या रस्त्यावरील अर्बन स्ट्रीटचे काम सुरू आहे. या कामामुळे एकीकडे वाहतूक नियोजनाचा खेळखंडोबा झाल्याचा आरोप होत आहे. तर, दुसरीकडे या कामामुळे रस्त्यांच्या कडेला असलेल्या झाडांवर संकट आले आहे. काम करताना बांधकामाचा राडारोडा झाडांच्या मुळाजवळ टाकला जात आहे. प्रशासनाकडून त्याकडे दुर्लक्ष होत आहे.



### वृक्षांचे आयुष्य धोक्यात, पर्यावरणप्रेमींमध्ये नाराजी

» पर्यावरणाचे संतुलन राहण्यासह संरक्षण आणि संवर्धन व्हावे, याकरिता रस्त्यांच्या दुतर्फा देशी प्रकारची झाडे महापालिकेच्या रस्त्यावरील फुटपाथवर लावली होती. त्या झाडांचे संगोपन व्हावे, झाडे लावण्याच्या त्यांची वाढ नीट व्हावी, यासाठी झाडांभोवती संरक्षण जाळ्या देखील लावण्यात आलेल्या होत्या. महापालिका रस्त्याच्या दुतर्फा विविध प्रजातींच्या वृक्षांची लागवड करण्यात आली. झाडांना दररोज पाणी सुध्दा देण्यात येत नाही. मात्र, झाडांच्या संगोपनासाठी झाडांना संरक्षण जाळी बसविण्यात आली होती. तरीही काही झाडांच्या जाळ्या काढून त्या झाडांची नासधूस केली जात आहे. त्यामुळे झाडांचे आयुष्य धोक्यात आले आहे. लागवड करण्यात आलेल्या झाडांपैकी काही झाडे सुस्थितीत आहेत. इतर वृक्षांचे आयुष्य धोक्यात आले आहे.

दापोडी ते निगडी या १२.५० किलोमीटर अंतराच्या मार्गावर १८३ फूट रुंदीचा प्रशस्त ग्रेड सेपरेटर मार्ग आहे. दोन पदरी बीआरटी मार्ग आहे. याच रस्त्यावर पिंपरी चौकातील डॉ. आंबेडकर पुतळा ते निगडीतील भक्ती-शक्ती समूह शिल्प चौकापर्यंत ५.१६ किमी अंतराचे ४९ कोटी ८१ लाख ८ हजार ३६२ रुपये खर्चाचे, तर पिंपरी चौकातील डॉ. आंबेडकर पुतळा ते दापोडीतील हॅरिस पूल-अंतर-६.५४ किमी आणि ९३ कोटी ७८ लाख ५२ हजार ४६० रुपये खर्चाचे अर्बन स्ट्रीट रस्त्याचे काम सुरू आहे. या कामामुळे नागरिकांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. त्यात ठेकेदार, अधिकार्‍यांकडून हे काम करताना अनेक चुका केल्या जात आहेत. काम सुरू असताना, तसेच काम झाल्यानंतर बांधाकामाचा राडारोडा, कचरा रस्त्याच्या कडेने असलेल्या झाडाच्या मुळाजवळ टाकला जातो.

पिंपरी-चिंचवड महापालिका भवनासमोरच सुरू असलेल्या कामात हे चित्र पाहायला मिळत आहे. यामध्ये वड, पिंपळ अशा देशी झाडांचा समावेश आहे. बांधकामाचा राडारोडा टाकल्यामुळे ही झाडांना धोका पोहचून ते नष्ट होण्याची शक्यता वृक्षप्रेमींकडून व्यक्त केली जात आहे. परंतु, अधिकारी, प्रशासनाकडून याकडे दुर्लक्ष होत आहे. त्यांनी संबधित ठेकेदाराला झाडांबाबत काळजी घेण्याची तंबी देण्याची गरज आहे. दरम्यान, नवीन रस्ता रुंदीकरणात अडथळा ठरणाऱ्या वृक्षतोड करण्यात येते. विकासकामांसाठी वृक्षांची मोठ्या प्रमाणात तोड केली जाते. तोड केलेल्या वृक्षांच्या जागी रस्त्याच्या कडेला झाडांचे रोपटे लावले जात नाही. त्या झाडांची पूर्ण वाढ होईपर्यंत महापालिकेने त्याकडे प्राधान्याने लक्ष देणे गरजेचे आहे. अशी मागणी नागरिकांतून होत आहे.

# पुणेकरांच्या पाण्यावर जलसंपदाला हवाय कंट्रोल

## पाण्याचा अतिरिक्त वापर रोखण्यासाठी पंपगृह हस्तांतरित करण्याची मागणी

**पुणे | प्रतिनिधी**

महापालिकेकडून पुणेकरांना केल्या जाणाऱ्या पाणीपुरवठ्यावर आता जलसंपदा विभागाला नियंत्रण ठेवायचे आहे. मंजूर केलेल्या कोट्यापेक्षा महापालिका अतिरिक्त पाण्याचा वापर करीत असल्याने महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाने ताशेरे ओढल्यानंतर खडकवासला धरणाखालील पंपगृहाचे नियंत्रण जलसंपदा विभागाकडे हस्तांतरित करावे, अशी सूचना पाटबंधारे विभागाने थेट महापालिकेला केली आहे. त्यावर आता महापालिका काय भूमिका घेणार, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.



पुणे शहराला खडकवासला धरणसाखळीतून पाणीपुरवठा होतो. पाटबंधारे विभागाने त्यासाठी गतवर्षी महापालिकेला लोकसंख्येनुसार 12.42 टीएमसी इतका पाणीसाठा मंजूर केला आहे. मात्र, महापालिकेकडून प्रत्यक्षात 21 टीएमसी इतके पाणी उचलण्यात आले आहे.

पाण्याच्या या अतिरिक्त वापराबाबत महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाने महापालिकेवर ताशेरे ओढले होते. तसेच, पाण्याचा हा अतिरिक्त वापर कमी करण्याचे आदेशही दिले होते. त्यासाठी प्रामुख्याने वितरण व्यवस्थेतील गळती रोखण्याबरोबरच पाणी मीटर बसवून त्यानुसार पाणीपुरवठा करण्याच्या सूचना केल्या आहेत.

दरम्यान, जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाने कान टोचल्यानंतर आता पाटबंधारे विभागानेच महापालिकेचा अतिरिक्त पाणीपुरवठा रोखण्यासाठी कडक भूमिका घेतली आहे. त्यासाठी खडकवासला धरणाखालील ज्या पंपगृहातून शहरासाठी पाणी सोडले जाते, त्याचेच नियंत्रण जलसंपदा विभागाला देण्याची सूचना पाटबंधारे विभागाच्या कार्यकारी अभियंत्याने महापालिकेला पत्राद्वारे केली आहे.

तसेच, पंपगृहात नक्की किती पाणी सोडले जाते, हे तपासण्यासाठी बसविण्यात आलेले मीटर सद्य:स्थितीला बंद असून, तेही तातडीने दुरुस्त करावे, असेही पाटबंधारे विभागाने महापालिकेला कळविले आहे.